दै. सत्यप्रभा दि. 15/08/2024

# इतवारा पोलिसांकडून दोन चोरटे गजाआड

## चार मोटारसायकलीसह पावणे दोन लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड, दि. १४ :** मालटेकडी ब्रिजच्या खाली छापा मारुन गजाआड केलेल्या दोन अट्टल चोरट्यांकडून सोन्या - चांदीच्या दागीने व चार मोटारसायकलीसह १ लाख ७७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्याची कारवाई इतवारा पोलिसांनी केली आहे.

यापकरणी अधिक माहिती अशी की, इतवारा ठाण्याचे पोलीस निरीक्षक रणजित भोईटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोउपनि रमेश गायकवाड, प्रो. पोउपनि. विलास पवार, एएसआय बाबा गजभारे, एएसआय देवीदास बिसाडे, पोहेकॉ. मोहन हाके, पोहेकॉ. एकनाथ मोकले, पोना. हबीब चाऊस, पोना. लक्ष्मण दासरवाड, पोना. धिरज कोमुलवार, पोकॉ. काकासाहेब जगताप, पोकॉ. रेवणदास कोळनुरे पाकॉ. नजरेआजम देशमुख, पोकों. महमद जावेद, पोकों. संघरत्न गायकवाड यांच्या संयुक्त पथकाने अभिलेखावरील गुन्हेगारांचा शोध सुरू केला असता दि. १२ ऑगस्ट रोजी गोपनिय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार दोन पंचासह मालटेकडी ब्रिजच्या खाली छापा टाकला. त्यावेळी तिथे दबा धरून बसलेले दोन सराईत गुन्हेगार महमद ऐजाज उर्फ बॅनेट पिता महमद अकबर (वय ३४ वर्षे) रा. गंगानगर देगलुर नाका, ह. मु. खडकपुरा आणि शेख अदनान सोहेल पिता शेख कासिम (वय २२ वर्षे ) रा. गंगानगर टायरबोर्ड या दोघानी पोलीस पथकाने ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडुन सोन्याचांदीचे दागीने व ४ मोटारसायकली असा एकूण १ लाख ७७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

### हिंगोली जिल्ह्यातील दोन गुन्हे उघडकीस

पोलिसांनी आरोपींना विश्वासात घेऊन विचारपुस केल्यानंतर इतवारा ठाण्यात दाखल ३११/२०२४ कलम ३०३ (२) बीएनएस २. पो.स्टे. लिंबगांव गुरनं. १७१/२०२३ कलम ३७९ भादंवी ३. पो.स्टे. हिंगोली शहर गुरनं ५२०/२०२४ कलम ३०३ (२) बीएनएस ४. पो.स्टे. हिंगोली शहर गुरनं. ५५५/२०२४ कलम ३०३(२) बीएनएस आदि गुन्हे उघडकीस आलेले आहेत. तसेच या आरोपींनी इतवारा ठाण्यातील दाखल असलेल्या गुन्हयाची घरफोडी केल्याची कबुली दिली.